

# श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट श्रीक्षेत्र, गुड्डापूर.
# ಶ್ರೀ ದಾನಮ್ಮದೇವಿ ದೇವಸ್ಥಾನ ಟ್ರಸ್ಟ ಶ್ರೀ ಕ್ಷೇತ್ರ ಗುಡ್ಡಾಪುರ.

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट या न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा ट्रस्टचे अध्यक्ष मा. श्री. विजुगौडा सिद्रामप्पा पाटील यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दि. ३०-०९-२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता गुड्डापूर येथील ट्रस्टच्या दासोह भवन हॉलमध्ये बोलविण्यात आली आहे. तरी सदर सभेस सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

## ✻ सभेपुढील विषय ✻

१. दि. २८-०९-२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२. ट्रस्टचे सन २०२५-२०२६ सालाचे हिशोब पत्रक, उत्पन्न खर्च पत्रक व ताळेबंद पत्रक (ऑडीटेड) वाचून मंजूरी देणे.

३. मा. लेखापरीक्षक यांचेकडून आलेल्या सन २०२५-२६ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल वाचून मंजुरी देणे.

४. सन २०२६-२०२७ या सालाकरिता विश्वस्त मंडळानी तयार केलेले अंदाज पत्रक वाचून मंजूर करणे.

५. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.

६. सभासदांकडून आलेल्या सुचना व प्रश्न यावर चर्चा करणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : गुड्डापूर

दिनांक : ११/०९/२०२६

श्री. विजुगौडा सिद्रामप्पा पाटील
अध्यक्ष
श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट, गुड्डापूर

### ✻ विशेष सुचना :

१. मा. लेखापरिक्षक यांच्याकडून सन २०२५-२०२६ वर्षाचे आलेले लेखापरिक्षण अहवाल, उत्पन्न खर्च पत्रक, ताळेबंद पाहण्याकरीता ट्रस्टच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

२. सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी ते लेखी स्वरूपात वार्षिक सभेच्या पाच दिवस अगोदर म्हणजे दि. २५/०९/२०२६ अखेर पर्यंत ट्रस्टच्या कार्यालयात द्यावेत.

३. गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा पुन्हा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेणेत येईल व त्यास गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.

४. कृपया सभासदांनी सभेस येताना आपले ओळखपत्र आणावेत.